# वन्यजीवांशी संघर्ष की सहअस्तित्व ?

**वनहक्क कायद्यातील संवेदनशील वन्यजीव अधिवासाच्या तरतुदी मनुष्य व वन्यजीव यांच्या सहअस्तित्वावर भर देतात आणि सहअस्तित्वाचे सर्व पर्याय संपले असतील तर ऐच्छिक पुनर्वसनाचा पर्याय सुचवतात. तेव्हा दीर्घकालीन विचार करता अशा सहअस्तित्वाला आणि वननिवासींबरोबर सहव्यवस्थापनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.**

**अतुल जोशी,**
**शरच्चंद्र लेले, पूर्णिमा उपाध्याय**



**वनहक्क जमीन मोजणीच्या कामाबाबत आदिवासींनी काढलेला मोर्चा.** (संग्रहित छायाचित्र)

'कोविड-१९'च्या साथीमुळे शहरातील लाखो स्थलांतरित कामगार गावांकडे परतले आहेत. यापैकी अनेक गावे संरक्षित क्षेत्रांच्या (अभयारण्य आणि राष्ट्रीय उद्यानांच्या) आत किंवा लागून आहेत. परतलेले कामगार आपली उदरनिर्वाहाची सोय गावातच होईल अशी आशा बाळगून आहेत. परंतु याचवेळी या गावांतील वननिवासी आणि वन विभाग यांच्यात एक नवीनच लढाई सुरू झाली आहे. वादाचा विषय हा की अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये "संवेदनशील वन्यजीव अधिवास' घोषित करून वननिवासींना विस्थापित करायचे काय?

## काय आहे वन्यजीव अधिवास ?

संवेदनशील वन्यजीव अधिवास ही २००६च्या वनहक्क कायद्यातील तरतूद आहे. वननिवासींचे (आदिवासी आणि जंगलालगत राहणारे इतर लोक ) जंगलांवरचे परंपरागत हक्क ब्रिटिशांनी हिरावून घेतले होते. स्वातंत्र्यानंतर ६० वर्षांनी ते अधिकार परत करून वननिवासींवरील हा "ऐतिहासिक अन्याय' दूर करण्याचा प्रयत्न वनहक्क कायद्यातून करण्यात आला. यात वननिवासींना जंगलातील पारंपरिक शेतीवर आणि निस्तारी जंगलांच्या व्यवस्थापनाचा हक्क पुन्हा देण्याची तरतूद आहे. परंतु या हक्कांमुळे वन्यजीवांच्या अधिवासाला टोकाचा धोका पोचणार असेल तर अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये दिलेल्या वनहक्कांमध्ये काही बदल करण्याची तरतूद आहे. बदल करूनही वननिवासी आणि वन्यजीव यांचे सहअस्तित्व शक्य नसेल, तर वननिवासींच्या संमतीने त्यांचे पुनर्वसन करण्याचीही तरतूद आहे. हे सर्व काम वन्यजीव आणि समाजशास्त्रातील तज्ज्ञांच्या समितीने स्थानिक लोकांच्या सहभागानिशी करावयाचे आहे. या तरतुदींनुसार निश्चित केलेल्या क्षेत्राला "संवेदनशील वन्यजीव अधिवास' म्हटले जाते.

## वाद कुठे आहे?

२०१४मध्ये "वनशक्ती' या मुंबईस्थित स्वयंसेवी संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली. त्यात संवेदनशील वन्यजीव अधिवास जाहीर करण्यात दिरंगाई होत आहे, असे म्हटले. न्यायालयाने या संदर्भातील केलेल्या विचारणेचा आधार घेत वन विभागाने महाराष्ट्रातील ५४ अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये तज्ज्ञ समित्या नियुक्त केल्या. यापैकी काही समित्यांनी त्या-त्या क्षेत्रांतील गावांमध्ये सुनावण्याही सुरू केल्या. परंतु यातील कित्येक गावांचे वनहक्काचे दावेच सरकारदरबारी पोहोचलेले नाहीत किंवा निकाली निघालेले नाहीत. शिवाय संवेदनशील अधिवास कशाला म्हणायचे याचे वैज्ञानिक निकष जाहीर केलेले नाहीत, ना त्यावर काही चर्चा करण्यात आली. न्यायालयाने याची नोंद घेत संवेदनशील वन्यजीव अधिवासाच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली. सर्वप्रथम अभयारण्य आणि राष्ट्रीय उद्यान क्षेत्रातील सर्व गावांचे वनहक्काचे दावे निकाली काढण्याचा आदेश दिला. परंतु त्याला काटशह देण्यासाठी वन विभागाने मार्चमध्ये ५४ पैकी २५ क्षेत्रांच्या हद्दीत मनुष्यवस्तीच नाही, त्यामुळे ती क्षेत्रे लगेचच संवेदनशील वन्यजीव अधिवास म्हणून घोषित करता येतील, असे न्यायालयात प्रतिपादन केले.

## वननिवासींचे हक्क डावलले

मात्र ही माहिती चुकीची असल्याचे आणि यापैकी अनेक अभयारण्यांमध्ये गावे असल्याचे दिसून येते. आम्ही अभ्यासलेली ३९ अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये असे आढळले, की त्यांच्या आत किंवा सीमेलगत एक हजाराहून अधिक गावे आहेत, ज्यांची एकूण लोकसंख्या चार लाखांच्या आसपास आहे. यापैकी केवळ १५० गावांना सामुदायिक वन हक्क मिळाले आहेत. बहुतेक वननिवासी, विशेषत: दुर्गम भागांमध्ये राहणारे, अद्यापही वनहक्क कायदा आणि त्याद्वारे मिळणाऱ्या त्यांच्या पारंपरिक वनहक्कांविषयी अनभिज्ञ आहेत. ज्यांनी दावे दाखल केले त्यांपैकी बरेच दावे "ही गावे अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात येतात', असे कारण देऊन अवैध पद्धतीने नाकारले गेले. उदा. मेळघाट अभयारण्यात बऱ्याच गावांचे दावे अवैधपणे नाकारले गेले किंवा अपूर्णपणे मंजूर केले गेले. तर अनेक गावांचे वनहक्काचे दावे प्रलंबित असताना त्यांचे पुनर्वसन करण्यात आले आणि काही गावांनी अजून वनहक्कांसाठी अर्जही केलेले नाहीत. महाराष्ट्रात इतरत्र स्थिती आणखी बिकट आहे. दुर्दैवाने, वननिवासींना दावे दाखल करण्याच्या प्रक्रियेत मदत करण्याची आणि या दाव्यांची निष्पक्षपाती आणि वेळेवर तपासणी सुनिश्चित करण्याची क्षमता आदिवासी विकास विभागाकडे नाही. त्यामुळे वनहक्क कायदा अस्तित्वात येऊन एक दशकाहून अधिक काळ लोटला, तरी या कायद्याची अंमलबजावणी अद्याप पूर्ण झालेली नाही.

## वन विभागाच्या प्रक्रियेत दोष

याशिवाय संवेदनशील वन्यजीव अधिवास जाहीर करण्याच्या वन विभागाच्या प्रक्रियेत अनेक त्रुटी दिसून येतात. सर्वप्रथम, बऱ्याच तज्ज्ञ समित्यांमध्ये या क्षेत्राशी परिचित पर्यावरणतज्ज्ञ आणि सामाजिक शास्त्रज्ञांचा समावेश नाही. काही समित्यांमध्ये अशा व्यक्तींचा समावेश आहे की ज्यांनी वनहक्क कायद्याच्या घटनात्मकतेलाच आव्हान दिले आहे. समित्या वापरत असलेल्या निकषांना वैज्ञानिक आधार नाही. सर्वांत मोठा विरोधाभास असा की काही वन अधिकाऱ्यांच्या मते संवेदनशील वन्यजीव अधिवासात मानवी हस्तक्षेप अजिबात नसावा व त्याकरिता वननिवासींना तेथून बाहेर काढावे लागेल, परंतु तिथे पर्यटन मात्र चालू ठेवायला त्यांची हरकत नाही !

## वन्यजीवांशी सहअस्तित्व शक्य

हजारो वर्षांपासून वन्यजीवांबरोबर राहणाऱ्या वननिवासींचे वनांमधून विस्थापन आवश्यक आहे काय? काही कट्टर वन्यप्रेमींच्या मते होय, वन्यजीव संवर्धनासाठी मनुष्यरहीत भागांची आवश्यकता आहे. याउलट अनेक पर्यावरणशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ मानतात की मनुष्य व वन्यजीव यांचे सहअस्तित्व शक्य आहे आणि वननिवासींना विस्थापित न करणे सामाजिकदृष्ट्या न्याय्यही आहे. वनहक्क कायद्यातील संवेदनशील वन्यजीव अधिवासाच्या तरतुदी मनुष्य व वन्यजीव यांच्या सहअस्तित्वावर भर देतात आणि सहअस्तित्वाचे सर्व पर्याय संपले असतील तर ऐच्छिक पुनर्वसनाचा पर्याय सुचवतात. यशस्वी सहअस्तित्वाची भारतात अनेक उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ, कर्नाटकातील बिळिगिरी रंगस्वामी व्याघ्र प्रकल्पात सोलिगा आदिवासी मोठ्या संख्येने असूनही येथील वाघांची संख्या सातत्याने वाढली आहे. पश्चिम घाटातील निलगिरी पर्वतरांगांमध्ये अनेक आदिवासी समुदाय आणि हत्ती एकमेकांशी जुळवून घेत राहताहेत. सर्वसाधारण वननिवासींकडे वन्यजीव संवर्धनासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि दृष्टिकोन दोन्ही असते. त्यामुळेच दीर्घकालीन विचार करता अशा प्रकारच्या सहअस्तित्वाला आणि वनन्विासींबरोबर सहव्यवस्थापनाला प्रोत्साहन देणे आवश्यक ठरते.

## पुनर्वसन हा शेवटचा पर्याय

वननिवासी समुदायांचे पुनर्वसन हा शेवटचा पर्याय म्हणून पाहिले पाहिजे. तथापि, काही वन्यजीवप्रेमी आणि वनाधिकारी या लोकशाही प्रक्रियांकडे दुर्लक्ष करीत आहेत आणि वननिवासींचे विस्थापन करण्यासाठी अजून एक साधन म्हणून वनहक्क कायद्यातील या तरतुदींचा उपयोग करण्याचा प्रयत्न करत आहेत. उदाहरणार्थ, वन विभागाने प्रकाशित केलेल्या मेळघाट वन्यजीव अभयारण्यातील प्रस्तावित संवेदनशील वन्यजीव अधिवासासाठी मार्गदर्शक पुस्तिकेत म्हटले आहे, की उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व संरक्षित क्षेत्रे (अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने) त्वरित संवेदनशील वन्यजीव अधिवास म्हणून घोषित करण्यात यावीत. संवेदनशील वन्यजीव अधिवासातील गावांना तेथून हटवले जाईल काय, याविषयी या पुस्तिकेत म्हटले आहे, की होय, या क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन केले जाईल, परंतु पुनर्वसन प्रक्रिया ऐच्छिक असणे आवश्यक असल्याने ही गावे सक्तीने विस्थापित होणार नाहीत. अशी उलटसुलट माहिती देत, कायद्यातील पळवाटा शोधून वननिवासींना विस्थापित करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, वन्यजीव आणि वननिवासी दोहोंच्याही न्याय्य संवर्धनासाठी सहअस्तित्व आणि सहव्यवस्थापन हाच एक शाश्वत उपाय आहे हे सर्वांनी लक्षात घेणे ही काळाची गरज आहे.